# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

यशवंतराव चव्हाण, नाट्यसंकुल, तळमजला, मनमाला टँक रोड,
माटुंगा-माहिम, मुंबई - ४०० ०१६.

जा. क्र. ७५९/२०१६-१७ दिनांक : १८ जानेवारी २०१७

## (फक्त सभासदांसाठी)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची इ. स. २०१५-१६ (१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६) ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०१७ रोजी दु. १२.०० वा. परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांचे अध्यक्षतेखाली यशवंत नाट्यमंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे होणार आहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

## - सभेपुढील विषय -

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सुधारणांसह संमत करणे.
२. इतिवृत्तातून निर्माण होणाऱ्या मुद्यांवर विचार करणे.
३. परिषदेचा १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
४. परिषदेचे १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
५. अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
६. इ. सन. २०१६-१७ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
७. इ. सन. २०१६-१७ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. सभासदांकडून रीतसर आलेल्या ठरावांवर व सूचनांवर चर्चा घडवून बहुमताने निर्णय घेणे.
९. नाट्यसंकुल प्रगतीचा आढावा घेणे व निधीविषयी विचार करणे.
१०. परिषदेच्या भावी कार्यासंबंधी विचार करणे.
११. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांची चर्चा करणे व ठराव संमत करून बहुमताने निर्णय घेणे.

आपला

(दीपक करंजीकर)
प्रमुख कार्यवाह.

## विशेष सूचना :

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. ज्या सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती माहिती दि. २५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०१७ पर्यंत प्रतिदिनी दुपारी ४ ते सायं. ६ या वेळात परिषद कार्यालय, माटुंगा-माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे पुरविण्यात येईल.
३. वार्षिक सभेत ठराव/सूचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सूचना दि. २८ जानेवारी २०१७ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.
४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदांसाठी शाखेच्या कार्यालयात तसेच मुंबईतील सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक २५ जानेवारी २०१७ पासून अवलोकनार्थ उपलब्ध होईल व मागणी केल्यास उपलब्ध करून दिला जाईल.

## महत्त्वाचे निवेदन

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची सभासद संख्या (शाखा सभासदांसहित) तेवीस हजाराहून अधिक आहे. या सर्वांना अहवाल पाठविण्यास वाढलेला टपालखर्च करणे आर्थिक तरतुदीच्या अभावी अशक्य आहे. त्यामुळे प्रतिवर्षी होणारा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा, नाट्य संमेलन, सत्कार आणि अन्य नाट्यविषयक कार्यक्रम हे वृत्तपत्राद्वारे सभासदांना कळविण्यात येतील. सर्व सभासदांनी परिषदेला याबाबतीत सहकार्य करावे ही विनंती.

आपला ईमेल आयडी पाठविल्यास वरील कार्यक्रम आपल्याला ईमेलद्वारे कळविण्यात येतील. कृपया आपला ईमेल आयडी कळवावा.